# महाराष्ट्र शासन
## वनविभाग
## मुख्य वनसंरक्षक (प्रा), ठाणे वनवृत्त, ठाणे

------------

## <u>वनरक्षक भरती प्रक्रिया सन २०१६</u>

<u>जाहिरात क्रमांक :- ०१/२०१६ दिनांक २६/०९/२०१६</u>

ठाणे वनवृत्ताच्या अधिनस्त वनविभागातील गट क मधील वनरक्षक या पदाकरिता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन (online) पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज मागविर्णेत येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची पध्दत व त्याबाबतच्या सविस्तर सुचना मे. महाऑनलाईन लिमिटेड या संस्थेच्या http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवारांने संपूर्ण जाहिरात व अनुषंगिक सुचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज दिनांक २६/०९/२०१६ ते १९/१०/२०१६ पर्यंत स्विकारले जातील.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-८ क्रमांक आरबीटीसी/ई-१३०१३(४)/नोटीफिकेशन-१/४७४/२०१४, दिनांक ९ जून, २०१४ व क्रमांक आरबी/टीसी/ई-१३०१३(४)/नोटीफिकेशन-२/४७४/२०१४/७३०, दिनांक १४/०८/२०१४ नुसार अनुसूचित क्षेत्रातील वनरक्षकांचे रिक्त पदे भरतांना स्थानिक आदिवासी अनुसूचित जमातीच्या उमेदवारांतून भरण्याचे आहेत. त्यानुसार वनरक्षक संवर्गाचे रिक्त पदांचे सामाजिक व समांतर आरक्षण खालीलप्रमाणे राहील.

अ) वर्ष २०१६ मधील वनरक्षक भरती करीता अनुसूचित क्षेत्रातील रिक्त पदांचा तपशिल (ठाणे वनवृत्तासाठी)

| जिल्हयाचे नांव | अनुसूचित जमाती रिक्त पदे | शेरा |
|---|---|---|
| ठाणे जिल्हा | १७ | ठाणे जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातीचे उमेदवारांसाठीच राखीव |
| पालघर जिल्हा | ३० | पालघर जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातीचे उमेदवारांसाठीच राखीव |
| **एकूण** | ४७ | |

**विशेष सुचना** - उपरोक्त नमुद अनुसूचित क्षेत्रामधून निवड होऊन नियुक्त झालेल्या वनरक्षक यांना त्या त्या अनुसूचित क्षेत्रामध्ये नोकरी करणे बंधनकारक असेल. ते इतरत्र बदलीस पात्र असणार नाहीत. (शासन निर्णय दि. ०१/०८/२०१४)

वर उल्लेखित **<u>अनुसूचित क्षेत्र -ठाणे जिल्हा</u>** पदांकरीता आरक्षणापैकी समांतर आरक्षण खालीलप्रमाणे राहील.

| विशेष समांतर आरक्षण | महिला ३३% | प्रकल्पग्रस्त/ धरणग्रस्त ५% | भुकंपग्रस्त २% | माजी सैनिक १५% | अति उच्च, गुणवत्ताधारक खेळाडू ५% | अंशकालिन १०% | होमगार्ड ५% | वनमजुर १०% | सर्वसाधारण | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. जमाती-पदे १७ | ६ | १ | ० | ३ | १ | २ | १ | २ | १ | १७ |

**(टिप :- उपरोक्त पदसंख्या ही विभागनिहाय अनुशेषावर आधारीत आहे.)**

वर उल्लेखित **<u>अनुसूचित क्षेत्र -पालघर जिल्हा</u>** पदांकरीता आरक्षणापैकी समांतर आरक्षण खालीलप्रमाणे राहील.

| विशेष समांतर आरक्षण | महिला ३३% | प्रकल्पग्रस्त/ धरणग्रस्त ५% | भुकंपग्रस्त २% | माजी सैनिक १५% | अति उच्च, गुणवत्ताधारक खेळाडू ५% | अंशकालिन १०% | होमगार्ड ५% | वनमजुर १०% | सर्वसाधारण | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. जमाती-पदे ३० | १० | २ | १ | ५ | २ | ३ | २ | ३ | २ | ३० |

**(टिप :- उपरोक्त पदसंख्या ही विभागनिहाय अनुशेषावर आधारीत आहे.)**

**विशेष टीप :-** वरील अनुसूचित क्षेत्रातील अनुसूचित जमातीची रिक्त पदे भरतांना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्णय/परिपत्रक/अधिसूचनांनुसार अनुसूचित क्षेत्रातील (Scheduled area) उमेदवार त्या त्या जिल्हयातील रहिवाशी असणे आवश्यक आहे. त्यापृष्ठयर्थ त्यांनी स्वत: किंवा त्यांचे वडील / आजोबा दिनांक २६/०१/१९५० ते आजतागायत सदर अनुसूचित क्षेत्रात सतत रहात असल्याचा पुरावा म्हणून सक्षम महसूल अधिकारी यांचा दाखला, प्रमाणपत्रे तपासणीच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे.

**ब) वर्ष २०१६ मधील भरतीकरीता अनुसूचित क्षेत्रा व्यतिरिक्त इतर क्षेत्रातील रिक्त पदांचा तपशिल.**

| प्रवर्ग- | अ.जा | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|
| पदसंख्या | ४ | ६ | ६२ | ७२ |

**(टिप :- उपरोक्त पदसंख्या ही अधिनस्त वनविभागनिहाय अनुशेषावर आधारित आहे.)**

**<u>उपरोक्त पदांचे समांतर आरक्षण खालीलप्रमाणे राहील.</u>**

| विशेष/समांतर आरक्षण | अ.जा | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| महिला ३०% | १ | २ | १९ | २२ |
| प्रकल्पग्रस्त/धरणग्रस्त ५% | ० | ० | ३ | ३ |
| भुकंपग्रस्त २% | ० | ० | १ | १ |
| माजी सैनिक १५% | १ | १ | ९ | ११ |
| अति उच्च, गुणवत्ता-धारक खेळाडू ५% | ० | ० | ३ | ३ |
| अंशकालिन १०% | ० | १ | ६ | ७ |
| होमगार्ड ५% | ० | ० | ३ | ३ |
| वनमजुर १०% | ० | १ | ६ | ७ |
| सर्वसाधारण | २ | १ | १२ | १५ |
| एकूण | ४ | ६ | ६२ | ७२ |

**<u>टिप</u> :- जाहिरातीत नमूद केलेली पदसंख्या हि दि. ३१ डिसेंबर २०१६ पर्यंतच्या रिक्त होणा-या पदावर आधारीत असल्याने सदर नियुक्ती या रिक्त पदाच्या उपलब्धतेवर अवलंबून राहील. "<u>रिक्त पदांची प्रवर्गनिहाय व एकूण संख्या परिवर्तनीय असून त्यामध्ये वाढ किंवा घट होवू शकते याची नोंद घ्यावी.</u> "**

**१. वेतनश्रेणी :-** रु.५२०० - रु.२०२००, ग्रेड पे - रु.१८००

**२. शैक्षणिक पात्रता :-** उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १२ वी) **<u>विज्ञान किंवा गणित किंवा भूगोल किंवा अर्थशास्त्र या विषयासह</u>** परीक्षा उत्तीर्ण केलेली असली पाहिजे.

**जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अमरावती / नागपूर यांनी असे स्पष्ट केले आहे की, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.आरटीए-१०८२-२३२७-सीआर-६३-१६-अ, दि.५ ऑक्टोबर, १९८९ नुसार एसएससी पास माजी सैनिकांना ज्यांची सैन्य सेवा १५ वर्ष झालेली आहे, त्यांना ज्या पदासाठी पदवी ही पात्रता आवश्यक आहे, त्या ठिकाणी ग्राहय धरण्यात येते. वनविभागाव्दारे करण्यात येत असलेल्या वनरक्षकांच्या पदांच्या भरतीमध्ये ज्याकरीता १२ वी ही शैक्षणिक अर्हता आवश्यक आहे, त्याकरीता एसएससी पास आणि कमीत कमी १५ वर्ष सैन्य सेवा झालेल्या व ज्यांच्या जवळ सैन्यसेवेतील पदवी प्रमाणपत्र आहे, असे माजी सैनिकांना वनरक्षक पदासाठी पात्र ठरविण्यात येईल. (याबाबत शासन धोरणामध्ये काही बदल झाल्यास सदर बदल हे उमेदवारांना बंधनकारक राहतील.)**

**विविध शासकीय कार्यालयाव्दारे वेगवेगळया पदांच्या भरतीसाठी ज्याकरीता शैक्षणिक पात्रता ही १२ वी पास असते, त्याकरीता सैन्य सेवेतील पदवी ही ग्राहय धरण्यात येत असते. म्हणून जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचेव्दारे दिलेल्या खुलाशानुसार अटी व शर्ती पुर्ण करणारे माजी सैनिकांना माजी सैनिक या समांतर आरक्षणाचे पदाकरीता अन्य आवश्यक अटी व शर्तीचे अधिन राहून शैक्षणिक पात्रतेच्या दृष्टिने पात्र / अपात्र ठरविण्यात येईल.**

(१) शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या उमेदवारांना आणि अनुसूचित जमातीतील सर्व उमेदवारांसाठी शैक्षणिक अर्हता माध्यमिक शालांत परिक्षा (इयत्ता १० वी) उत्तीर्ण अशी राहील.

टिप :- नक्षलग्रस्त भागात वास्तव्य करीत असल्याबाबत सवलतीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्राप्त केलेले वास्तव्य प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३. **वयोमर्यादा :-** उमेदवाराचे वय दि. २६ सप्टेंबर, २०१६ रोजी किमान १८ वर्षापेक्षा कमी व कमाल २५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**३.१ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम.**

(एक) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत.

(दोन) **महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शुध्दीपत्रक क्र.मासैक-१०-१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि.२० ऑगष्ट, २०१० अन्वये "माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांसाठी नेमणुकीकरीता विहीत वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील."**

(तीन) पात्र खेळाडुच्या बाबत ५ वर्षापर्यंत.

(चार) स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी, प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांच्या बाबतीत खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकरिता तसेच मागासवर्गीय उमेदवाराकरिता सरसकट कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष राहील, सुशिक्षित बेरोजगार, अंशकालिन व रोजंदारी वनमजूर उमेदवारांकरिता सरसकट कमाल वयोमर्यादा ४६ वर्ष राहिल.

(पाच) वनविभागातील अधिसंख्य वनमजूरांना महसूल व वनविभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक एलएबी १०९४/ प्र.क्र.२५२/फ-९, दिनांक ३१-७-२००३ नुसार वयोमर्यादेसंबंधी अट शिथिलक्षम.

४. **वनरक्षक पदासाठी शारीरिक पात्रता.**

| **शारीरीक माप** | **उमेदवाराचा प्रवर्ग** | |
|---|---|---|
| | पुरुष | स्त्री |
| उंची (से.मी. मध्ये ) | १६३ | १५० |
| छातीचा घेर --<br>न फुगवता (से.मी. मध्ये )<br>फुगवून (से.मी. मध्ये) | <br>७९<br>८४ | <br>--<br>-- |
| वजन (कि.ग्र.मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात. | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात. |
| (अनुसूचित जमाती मधील उमेदवारासाठी खालील प्रमाणे शिथिलक्षम) | | |
| उंची (से.मी. मध्ये) | १५२.५ | १४५ |
| छातीचा घेर --<br>न फुगवता (से.मी. मध्ये )<br>फुगवून (से.मी. मध्ये) | <br>७९<br>८४ | <br>--<br>-- |
| वजन (कि.ग्र.मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात. | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात. |

(चार) दूर दृष्टी आणि जवळील दृष्टीचे चष्मे व विना चष्म्याचे खालील मानक पूर्ण करतात.

**दूरदृष्टी**

| अधिक चांगला डोळा | वाईट डोळा |
|---|---|
| (सुधारलेली दृष्टी) | |
| ६/६ | ६/१२ |
| किंवा | किंवा |
| ६/९ | ६/९ |

**जवळील दृष्टी**

| अधिक चांगला डोळा | वाईट डोळा |
|---|---|
| (सुधारलेली दृष्टी) | |
| J.१ | J.११ |

प्रत्येक डोळा संपूर्ण क्षेत्र दृष्टीयुक्त असणे आवश्यक आहे.

(ब) शासकीय वैद्यकीय अधिकारी किंवा वैद्यकीय तपासणी संदर्भात प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय विशेषज्ञांकडून वैद्यकीय पात्रता प्रमाणित करण्यात येईल. वैद्यकीय चाचणीमध्ये तिरळेपणा, रंग व रात आंधळेपणा, आतल्या बाजूला फेंगाडे असलेले गुडघे, सपाट पाय, त्वचा व छातीचे रोग या संबंधीचा आणि अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) यांनी वेळोवेळी विहित केलेल्या अन्य वैद्यकीय चाचणीचा समावेश राहील.

(क) नक्षलवाद्यांच्या हल्यात मरण पावलेल्या किंवा गंभीररित्या जखमी झालेल्या वनखबरे व वनकर्मचा-यांचे मुलांना शारीरिक पात्रतेबाबत खालील नमूद केल्याप्रमाणे सूट देण्यात येईल.

१) उंची :- पुरूष आणि स्त्री उमेदवारासाठी २.५ से.मी.
२) छाती :- मोजणी आवश्यक नाही.

(ड) **खेळाडू प्रवर्ग :-** विहित शैक्षणिक अर्हता धारण करणा-या व वयोमर्यादेची अट पूर्ण करणा-या खेळाडूना, विहित उंचीमध्ये २.५ से.मी. इतकी सवलत देण्यात येईल.

(इ) **वनकर्मचा-यांचे पाल्यांना शारीरिक अर्हतेत सवलत :-** सेवेत कार्यरत असतांना मृत्यू पावलेल्या वनकर्मचा-यांच्या एका मुलास किंवा मुलीस शारीरिक पात्रतेत खालील प्रमाणे सवलत देण्यात येईल.

(ए) उंची :- पुरुष आणि स्त्री उमेदवारास २.५ से.मी.
(बी) छाती :- पुरुष उमेदवारांना २.० से.मी. न फुगवता व १.५ से.मी.फुगवून.

(फ) **किमान सापेक्ष ऊंची, वजन व छातीची मोजमापे :-**
**शासन पत्र क्रमांक एफएसटी-०७/११/प्र.क्र.२८७/फ-४, दि.२४/८/२०११.**

उपरोक्त शासन पत्रातील निर्देशानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम-१९८१ मधील परिशिष्ट-३ मध्ये महाराष्ट्र वनसेवेतंर्गत निवड करण्यात आलेल्या उमेदवारांसाठी विहीत केलेल्या ऊंची व वजनाच्या तक्त्याप्रमाणे वनरक्षक या पदासाठीही उंचीच्या प्रमाणात वजन आवश्यक राहील. वैद्यकिय तपासणी करणा-या व्यक्तींच्या मार्गदर्शनाकरीता सर्वसाधारण नियमानुसार पुरेशी मानली जाणारी किमान सापेक्ष उंची, वजन व छातीची मोजमापे दर्शविणारा तक्ता नमुद आहे. त्याप्रमाणे कार्यवाही होईल.

५.	**निवडीची पध्दत :-**

५.१	उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा व त्यांची ठाणे वनवृत्तातील आदिवासी दुर्गम भागात काम करण्याची तयारी असावी.

५.२	वनरक्षक पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवार किमान शारीरीक पात्रता धारण करतात किंवा कसे हे निश्चित करण्याच्या दृष्टीने उमेदवारांची मोजमापे स्थानिक शासकीय वैद्यकिय अधिकारी यांच्या उपस्थितीत घेण्यात येतील.

५.३	जे उमेदवार किमान शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादेची अट तसेच किमान शारीरीक पात्रता धारण करतात त्या पात्र उमेदवारांची खालील प्रमाणे शारीरीक क्षमता चाचणी घेण्यात येईल.

**(अ) शारीरीकदृष्टया सक्षम उमेदवारांची प्राधांन्याने निवड करण्याच्या दृष्टीने विहित केलेल्या शारीरीक मोजमापाप्रमाणे व शारीरिक दृष्टया सुदृढ असल्याबाबत वैद्यकिय प्रमाणपत्र धारण करणा-या पात्र ठरलेल्या उमेदवारांची प्रथम धावण्याची चाळणी चाचणी घेण्यात येईल. ही चाळणी चाचणी स्पर्धात्मक स्वरुपाची व बाद पध्दतीची असेल यामध्ये प्रथम येणारे पदसंख्येच्या ३ पट एवढे प्रवर्गनिहाय उमेदवार पुढील फेरीसाठी पात्र ठरविण्यात येतील. उमेदवारांची संख्या निश्चित करतांना विहित करण्यात आलेले आरक्षणही विचारात घेण्यात येईल.**

**(ब ) सदर धावण्याची चाळणी चाचणी पुरुष उमेदवारांनी ५ कि.मी. व महिला उमेदवारांनी ३ कि.मी.जास्तीत जास्त ३० मिनीटामध्ये पूर्ण करणे आवश्यक राहील.**

**(क) शासन निर्णय दि. २२/८/२०१२ मधील भरतीसंबंधी कार्यपध्दतीमध्ये शारीरिक क्षमता चाळणी चाचणी परिक्षेकरीता शारीरिक दृष्टया सुदृढ असल्याबाबत शासकीय वैद्यकिय अधिका-यांकडून तपसाणी करुन तसे प्रमाणपत्र संबंधित उमेदवारांने धावण्याच्या चाळणी परिक्षेकरिता सोबत आणणे आवश्यक आहे. अशा प्रमाणपत्राशिवाय त्या उमेदवारांची धावण्याची चाळणी चाचणी घेतली जाणार नाही याबाबत उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

**(ड) शासन पत्र क्र.एफएसटी-०७/११/प्र.क्र.२८७/फ-४, दिनांक २१/०७/२०१४ अन्वये वनरक्षक भरती प्रक्रियेसंदर्भात धावण्याच्या चाचणी परिक्षेमध्ये प्राप्त होणारे गुणांना १२.५% भारांकन देण्यासाठी शासनाने मंजूरी प्रदान केलेली आहे. शैक्षणिक अर्हता परिक्षेमध्ये प्राप्त गुणांच्या टक्केवारीचे ८७.५% केलेले भारांकन व १२.५% भारांकन करिता धावण्याच्या चाचणी परिक्षेमध्ये प्राप्त केलेले गुण यांची बेरीज करुन उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. वनरक्षक भरती प्रक्रियेसंदर्भात धावण्याच्या चाचणी परिक्षेमध्ये खालीलप्रमाणे गुण देणेबाबत शासनाने मान्यता दिलेली आहे.**

**१. पहिल्या येणा-या ३ उमेदवारांस (अ.क्र.१ ते ३ वरील आलेले) यांना प्रत्येकी-१० गुण**
**२. त्यानंतर येणा-या ५ उमेदवारांस (अ.क्र.४ ते ८ वरील आलेले) यांना प्रत्येकी-८ गुण**
**३. त्यानंतर येणा-या ७ उमेदवारांस (अ.क्र.९ ते १५ वरील आलेले) यांना प्रत्येकी-६ गुण**
**४. त्यानंतर येणा-या १० उमेदवारांस (अ.क्र.१६ ते २५ वरील आलेले) यांना प्रत्येकी-४ गुण**
**५. त्यानंतर येणा-या १५ उमेदवारांस (अ.क्र.२६ ते ४० वरील आलेले) यांना प्रत्येकी-२.५ गुण**

**उदाहरणार्थ :-** श्री "क" या उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता परिक्षा (उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता १२ वी) मध्ये एकूण निर्धारित ५०० गुणांपैकी ३०० गुण प्राप्त केले आहे. त्यांची टक्केवारी ६०% येईल. त्यांचे ८७.५% भारांकन म्हणजे ५२.५० एवढे येईल. तसेच ५ कि.मी. / ३ कि.मी. धावण्याच्या चाचणी परिक्षेत समजा तो ७ व्या क्रमांकावर आलेला आहे, तर उर्वरीत १२.५% भारांकन करिता त्यांना दि.२१/०७/२०१४ च्या शासन पत्रानुसार १२.५% पैकी ८ गुण मिळतील. याप्रमाणे गुणवत्ता यादी करिता त्यांना मिळणारे गुण = ५२.५० + ८= ६०.५०% अशा प्रकारे गणना केली जाईल.)

**टिप :- या ठिकाणी गुणवत्ता यादी करताना ज्या उमेदवारांना शैक्षणिक अर्हतेमध्ये सवलत देऊन माध्यमिक शालांत परीक्षा अर्हता निश्चित केली आहे अशा उमेदवारांचे बाबतीत माध्यमिक शालांत परीक्षेमधील सर्व विषयांचे मार्क एकत्रित करुन त्यावरुन येणारी टक्केवारी विचारात घेण्यात येईल.**

**(इ) बहुतांश वनक्षेत्र हे भौगोलीक दृष्टया दुर्गम क्षेत्रात अस्तित्वात आहे. वनरक्षक हे वनविभागातील क्षेत्रीय स्तरावरील आघाडीवरील पद (Frontline Staff) असून वनरक्षकाने वनसंरक्षणाच्या दृष्टिने वनक्षेत्रात पायी फिरून गस्त घालणे आवश्यक असते. त्यामुळे वनरक्षक या पदासाठी ४ (चार) तासामध्ये पुरुष उमेदवारांना २५ कि.मी. चालणे व महिला उमेदवारांना ⊗१६ कि.मी. चालणे अशी शारीरीक क्षमता चाचणी विहित करण्यात येत आहे.**

⊗**(टिप . उपरोक्त नमूद शैक्षणिक अर्हता परिक्षा एकापेक्षा जास्त संधीत उत्तीर्ण झाली असेल तर त्या प्रत्येक परीक्षेचे गुणपत्रक (मार्कलिस्ट) ची साक्षांकित प्रत प्रमाणपत्र तपासणी वेळी मूळ प्रतीसह समक्ष आणणे आवश्यक आहे. अशी सर्व गुणपत्रके न आणल्यास असा उमेदवार अपात्र समजला जाईल.)**

५.४ शासन निर्णय क्रमांक एफएसटी-०७/११/प्र.क्र.२८७/फ-४, दि.३० जुलै, २०११ अन्वये २५ कि.मी.पुरूष उमेदवारासाठी तर १६ कि.मी. स्त्री उमेदवारासाठी चालण्याची शारिरिक क्षमता चाचणी घेण्यात येईल. उपरोक्त चाचणी ही चार तासांमध्ये पुर्ण करणे बंधनकारक राहील.

**<u>निवड प्रक्रियेचे वेळापत्रक - वनरक्षक संवर्ग</u>**

| अ. क्र. | टप्पा | दिनांक |
|---|---|---|
| १ | विविध माध्यमातुन प्रसिध्दी देऊन ऑनलाईन अर्ज मागविणे. वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्याची अंतिम तारीख. | दिनांक २६/०९/२०१६ |
| २ | ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख. | दिनांक १९/१०/२०१६ |
| ३ | प्राप्त ऑनलाईन अर्जानुसार उमेदवारांची शारीरीक पात्रता तपासणीचा कार्यक्रम व ५ कि.मी./३कि.मी. धावण्याची चाळणी चाचणीचा कार्यक्रम प्रसिध्द करणे. | दिनांक ०३/११/२०१६ |
| ४ | उमेदवारांची शारीरीक पात्रता तपासणे. (ऊंची,छातीचे माप व वजन) | दिनांक ०५/११/२०१६ ते दिनांक ०८/११/२०१६ |
| ५ | शारिरिक अर्हतामध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची ५ कि.मी./३ कि.मी. धावण्याची चाळणी चाचणी घेणे. | |
| ६ | ५ कि.मी./३ कि.मी. धावण्याची चाळणी चाचणीमध्ये नियमानुसार १:३ प्रमाणात पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी तसेच प्रमाणपत्र तपासणी कार्यक्रम प्रसिध्द करणे. | दिनांक १९/११/२०१६ |
| ७ | धावण्याची चाळणी चाचणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची शैक्षणिक व इतर अर्हताबाबत प्रमाणपत्र तपासणी करणे. | दिनांक २२/११/२०१६ ते दिनांक २५/११/२०१६ |
| ८ | उमेदवारांची शैक्षणिक अर्हता परिक्षेमध्ये प्राप्त गुणांचे ८७.५% भारांकन + शासन पत्र दिनांक २१/०७/२०१४ अन्वये ५ कि.मी. / ३ कि.मी. धावण्याच्या चाचणीमध्ये मिळालेल्या गुणांची बेरीज करुन निवड यादी तयार करुन जाहिर करणे (२५ कि.मी./१६ कि.मी. अंतर चार तासात पूर्ण करण्याची शारिरिक क्षमता चाचणी पात्रतेच्या अधिन राहून) व शारिरिक क्षमता चाचणी करिता कार्यक्रम प्रसिध्द करणे. | दिनांक ३/१२/२०१६ |
| ९ | निवड झालेल्या उमेदवारांची चार तासात २५ कि.मी./१६ कि.मी. अंतर पूर्ण करण्याची शारिरिक क्षमता चाचणी घेणे. | दिनांक १०/१२/२०१६ ते दिनांक ११/१२/२०१६ |
| १० | चार तासात २५ कि.मी./१६ कि.मी. अंतर पूर्ण करण्याच्या शारिरिक क्षमता चाचणीमध्ये पात्र ठरलेल्या निवड यादीतील उमेदवारास वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र सादर करण्यास कळविणे तसेच सक्षम वैद्यकीय अधिकारी यांचेकडून वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र प्राप्त करणे | दिनांक १२/१२/२०१६ ते दिनांक २६/१२/२०१६ |
| ११ | वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकारी यांनी उमेदवारांना वनरक्षक पदावरील नियुक्तीचे आदेश देणे. | दिनांक ३०/१२/२०१६ |

सदर वेळापत्रकामध्ये काही अपरिहार्य कारणामुळे बदल होऊ शकतो. असे बदल झाल्यास वेळोवेळी झालेले बदल http://maharecruitment.mahaonline.gov.in व http://mahaforest.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येतील.

(i) शारीरीक पात्रता तपासणीचे स्थळ आणि वेळ. - याबाबत सुचना वेळोवेळी खालील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

http://maharecruitment.mahaonline.gov.in
http://mahaforest.gov.in

**निवडसूचीत समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या खालील शासन निर्णयातील तरतूदीनुसार निश्चित केली जाईल :-**

**१. शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रानिम-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दि.१९/१०/२००७**

**२. शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रानिम-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दि.२७/०६/२००८**

**३. शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रानिम-१२१४/प्र.क्र.(४३/१४)१३-अ, दि.०५/०६/२०१४**

**४. सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रं. बीसीसी-२०१४/प्र.क्र.२१३-A/१४/१६-ब, दि. २६/०६/२०१५**

**५. शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रानिम-१२१५/प्र.क्र.५५/१५/१३-अ, दि. ०५/१०/२०१५**

## ६. सर्वसाधारण अटी :-

६.१ सेवाप्रवेश नियमातील अटीनुसार संबंधित संवर्गातील उमेदवारांना मराठी भाषा वाचता, लिहिता व बोलता येणे आवश्यक आहे.

६.२ उमेदवार महाराष्ट्र राज्याचा कायमचा रहिवासी असावा.

६.३ "महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक भुकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दिनांक २७/८/२००९ अन्वये प्रकल्पगंस्तांना असलेले ५ % समांतर आरक्षण त्यांचेसाठीच राखून ठेवून आरक्षणाअंतर्गत भूकंपग्रस्तांसाठी ठेवलेले आरक्षण काढून भूकंपग्रस्तांसाठी स्वतंत्रपणे २ % समांतर आरक्षण लागू राहील"

६.४ सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८१/१३-अ दिनांक १६/३/१९९९ अन्वये समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्याने सामाजिक आरक्षणाचा प्रत्येक प्रवर्गामध्ये (उभे आरक्षण जसे अ.जा., अ.ज., वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व., आणि इतर प्रवर्ग) विशेष आरक्षणानुसार होणा-या राखीव पदाची संख्या पदांचा तपशिल या शिर्षातंर्गत दर्शविण्यात आलेला आहे. समांतर आरक्षणाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास सर्व समांतर पदे त्या त्या सामाजिक प्रवर्गातुन भरण्यात येतील.

६.५ वि.जा.(अ), भ.ज. (ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र व इमाव या प्रवर्गातील उमेदवारासाठी शासन परिपत्रक सामाजिक न्याय, सांस्कृतीक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सी.बी.सी-१०/२००६/प्र.क्र.१५/ मावक-५ दिनांक ३०/६/२००६ सोबतच्या सुधारित नमुन्यात शासन निर्णय क्र.सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/मावक, दिनांक १५/०७/२०१४ व शासन निर्णय क्र.अविवि/२०१४/प्र.क्र.८१/का-७, दिनांक १९/०७/२०१४ मध्ये नमूद केलेप्रमाणे त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे कालावधीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

खुल्या प्रवर्गातील व मागासप्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील महिलासाठी असलेले ३० टक्के आरक्षण उन्नत व प्रगत व्यक्ति / गटातील (क्रिमीलेअर) कुटुंबातील महिला सदस्यांना अनुज्ञेय राहणार नाही.

६.६ महिला आरक्षणा करिता अर्ज करतांना खुल्या प्रवर्गातील व मागास प्रवर्गातील इतर मागास वर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील महिला उमेदवारानी त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे कालावधीचे सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

६.७ खुल्या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती / कुटूंबातील (क्रिमीलेअर) खेळाडू उमेदवारांना खेळाडूसाठी असलेले आरक्षण अनुज्ञेय असणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती अथवा गटातील खेळाडू सदस्यांना खेळाडुचे ५% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

६.८ रोजगार कार्यालय, जिल्हा समाज कल्याण कार्यालय, सैनिक कल्याण कार्यालय इत्यादि कार्यालयाकडे नोंदणीकृत असलेल्या उमेदवारांनी देखील परस्पर संबंधित संकेतस्थळावर विहित केलेल्या पध्दती प्रमाणे अर्ज सादर करावा.

६.९ वनविभागात कार्यरत असलेल्या सर्व अधिसंख्य वनमजूरानी ते ज्या पदाची पात्रता धारण करीत आहेत त्या पदाकरिता विहित केलेल्या पध्दती प्रमाणे सरळ मार्गाने संकेतस्थळावर अर्ज सादर करावा.

६.१० अनुभवाच्या बाबतीत तासीका, नियत कालीक, अंशकालिक, विद्यावेतन, अभ्यागत, अंशदानात्मक, विद्यावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही.

६.११ पडताळणी अंती अर्ज रद्य ठरविणे, निवड प्रक्रियेत वेळेवर बदल करणे, उमेदवारांची अंतिम निवड करणे, जाहिरातीचे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणे व आवश्यकते नुसार संपूर्ण भरती प्रक्रीयेत बदल करणे या बाबतचे संपुर्ण अधिकार निवड समितीने राखुन ठेवलेले आहेत.

६.१२ सेवाशर्तीनुसार अपात्र ठरलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वगळण्यात येईल. त्याबाबत पत्रव्यवहार केला जाणार नाही.

६.१३ उमेदवारांना शारिरीक क्षमता चाचणी व इतर बाबींकरिता कोणत्याही प्रकारचा भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

६.१४ वनविभागातील वनरक्षक या पदावर नियुक्ती करतांना एकूण ५ % पदे होमगार्डस मध्ये कमीत कमी ३ वर्षे इतकी सेवा झालेल्या व वनरक्षक पदासाठी आवश्यक शैक्षणिक / शारिरीक पात्रता पुर्ण करणा-या विहीत वयोमर्यादेतील तसेच विहीत पात्रता परिक्षा उत्तीर्ण होणा-या होमगार्डस मधून भरण्यात येतील.

६.१५ "सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य' या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदविधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय / निमशासकीय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदावरील सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी १० % समांतर आरक्षण लागू करण्यात येत आहे व त्यांना सध्याच्या ४५ वर्षे मर्यादेत आणखी १ वर्षाने वाढ करून सदर सवलत ४६ वर्षापर्यंत देण्यात येईल."

६.१६ शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दि. १.०७.२००५ नुसार उमेदवारास दि. २८.०३.२००५ नंतर दोनपेक्षा अधिक मुले नसल्याबाबत **"लहान कुटुंबाची"** अट लागू राहील.

६.१७ वनमजूरांनी अर्ज करताना जाहिरातीचे दिनांकास त्यांनी प्रतिवर्षी किमान २४० दिवस ५ वर्षे काम केले असल्याबाबत योग्य ते संबंधित सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

६.१८ अर्जदाराने त्यांचे आतापर्यंतच्या आयुष्यात किमान १० वृक्षांचे रोपन केले आहे काय ? आजपर्यंत १० वृक्षाचे रोपन केले नसल्यास, अर्जदाराने भविष्यात होणाऱ्या वृक्षलागवडीच्या कार्यक्रमात स्वयंस्फुतीने किमान १० वृक्ष लावण्याची प्रतिज्ञा करणे आवश्यक आहे.

**७. अर्ज भरणे व सादर करणेबाबत आवश्यक सुचना:-**

७.१ उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी, भरावयाची सर्व माहिती आपलेकडे उपलब्ध आहे याची खात्री करावी व नंतरच आपला अर्ज भरावा. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारले जातील.

७.२ पात्र उमेदवाराला वेब बेस (Web-based) ऑनलाईन अर्ज **दिनांक २६/०९/२०१६ ते १९/१०/२०१६** या कालावधीतच http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक राहील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

७.३ अर्जात हेतूपुरस्सर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनाधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले व बनावट दाखले सादर करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे गैरप्रकार करणा-या उमेदवारांना निवडींसाठी अनर्ह ठरविणे प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमाचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करणेचे अधिकार मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) ठाणे वनवृत्त, ठाणे यांना राहतील. तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल.

७.४ वय, शैक्षणिक अर्हता, मागासप्रवर्ग/नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र, महिला, माजी सैनिक, खेळाडू, अनुभव, पात्रता इत्यादी संदर्भात न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे/निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास, संबंधित दाव्याचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

७.५ वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिका-याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र ग्राहय धरणेत येईल.

७.६ एस.एस.सी/मॅट्रीक्युलेशन अथवा शाळा सोडल्याचा दाखला,जन्माचा दाखला या प्रमाणपत्रवरील जन्मदिंनाकानुसार अर्जामध्ये जन्मदिनांक निवडावा. स्त्री/पुरुष संदर्भात संबंधित पर्याय निवडावा. तसेच अमागास, नॉन-क्रिमीलेअर, माजी सैनिक, खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन इत्यांदी संदर्भात लागू असलेली माहिती निवडावी.

७.७ शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबंधित परिक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिंनाक समजणेत येईल व त्या आधारे उमेदवाराची पात्रता ठरविणेत येईल.

**७.८ ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची सर्वसाधारण प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.**

१.प्रोफाईल निर्मिती/प्रोफाईल अद्यावत करणे.
२.अर्ज सादरीकरण.
३.शुल्क भरणा.

**७.९ प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्यावत करणे.**

१. http://maharecruitment.mahaonline.gov.in या सकेंतस्थळावर वापरकर्त्याने प्रोफाईल निर्मिती करण्याकरिता नवीन वापरकर्त्याची नोंदणी वर क्लिक केल्यानंतर यंत्रणा लॉग-इन पृष्ठ प्रदर्शित करेल. नवीन खाते (वापरकर्त्याचे नाव Login व

Password) निर्माण करण्यासाठी लॉग-इन पृष्ठाव्दारे विचारलेली सर्व माहिती भरुन नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी.

२. प्रोफाईलव्दारे माहिती भरताना उमेदवाराने स्वत:चाच ई मेल आय.डी., मोबाईल क्रमांक व जन्म दिनांक नोंदविणे आवश्यक आहे.

३. उमेदवारांकडे नित्य वापरात असेल असा ई मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच भरती प्रक्रियेदरम्यान पत्रव्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्याकारणामुळे भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वैध/कार्यरत राहणे आवश्यक आहे.

४. वरील प्रमाणे प्रोफाईलची निर्मिती झालेनंतर वापरकर्त्याने (Login व Password) व्दारे प्रवेश करुन प्रोफाईलमध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती, संपर्क तपशिल, इतर माहिती, शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी संदर्भातील तपशिलाची अचूक नोंद करावी.

५. फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे:-

नोंदणीची प्रक्रिया व प्रोफाईलव्दारे विचारलेली माहिती भरुन झाल्यानंतर उमेदवाराने स्वत:चे छायाचित्र / फोटो (रुंदी ३.५ सें.मी. x उंची ४.५ सें.मी.) व स्वत:ची स्वाक्षरी स्कॅन करुन खालीलप्रमाणे अपलोड करावी.

१) एका पांढ-या स्वच्छ कागदावर विहित आकाराचा फोटो चिकटवावा. फोटोवर स्वाक्षरी करु नये अथवा फोटो साक्षांकित करु नये. वरील सुचनांनूसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा, स्टॅपल अथवा पिनिंग करु नये. फक्त स्कॅनरवर ठेवून थेट स्कॅन करता येईल.

२) फोटोचा आकार खालीलप्रमाणे असणे गरजेचे आहे.




३) छायाचित्र अर्जाच्या दिनांकाच्या सहा महिन्याहून आधी काढलेले नसावे आणि ते ऑनलाईन परिक्षेच्या वेळी उमेदवाराच्या रुपाशी जुळणारे असावे.

४) विहित आकार/क्षमतेप्रमाणे काळया शाईच्या पेनने स्वच्छ कागदावर स्वाक्षरी करावी.

५) उमेदवाराने स्वत: स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरी केल्यास ती ग्राहय धरण्यात येणार नाही.

६) वरीलप्रमाणे विहित आकारातील फक्त फोटो व स्वाक्षरी वेगवेगळी स्कॅन करावी. संपूर्ण पृष्ठ अथवा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करु नये.

७) फोटो व स्वाक्षरीची प्रत्येकाची संपूर्ण इमेज स्कॅन करुन jpg फॉर्मेट मध्ये संगणकावर वेगवेगळया फाईल्समध्ये स्वतंत्रपणे जतन (Save) करावी. फोटो, तसेच स्वाक्षरी इमेज प्रत्येकी ५० Kb पेक्षा जास्त असता कामा नये. यापेक्षा जास्त क्षमतेची इमेज प्रणालीवर स्वीकारली जात नाही. इमेजची साईज ५० Kb पेक्षा जास्त असल्यास स्कॅनरचे dpi resolution, no. of colours, etc. व्दारे स्कॅनिंगच्या वेळी Setting Adjust करावे.

८) स्कॅन करुन अपलोड केलेली स्वाक्षरी, प्रवेशपत्र / हजेरीपट व तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल. परीक्षेच्या वेळी, प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरताना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल, अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

## ७.१० अर्ज सादरीकरण:

१ http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर वापरकर्त्याने स्वत:च्या युजर आयडी व पासवर्डव्दारे यशस्वीरित्या प्रवेश (Login) केल्यानंतर "ऑनलाईन अर्ज" येथे क्लिक करावे. जाहिरातीव्दारे प्रसिध्द केलेल्या पदाबाबतची यादी या ठिकाणी उपलब्ध होईल.

२ ज्या पदासाठी अर्ज करावयाचा असेल त्या जाहिरातीच्या उजवीकडे असलेल्या "अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा" या ठिकाणी क्लिक करावे.

३ उमेदवाराच्या प्रोफाईलच्या आधारे यंत्रणा वैधता तपासेल, वापरकर्ता जाहिरातीतील निकष पूर्ण करीत असल्यास वापरकर्त्याला अर्ज सादर करता येईल.

४ जाहिरातीमध्ये नमूद केलेले निकष वापरकर्ता पूर्ण करीत नसल्यास माहिती संग्रहित होऊ शकत नाही असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल. अर्ज यशस्वीरीत्या सादर झाल्यानंतर तुमचा अर्ज यशस्वीरित्या जतन झाला असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल.

५ रक्कम भरा या पर्यायावर क्लिक करुन अर्जदाराला क्रेडीट कार्ड/डेबीट कार्ड/नेट बँकिंग (३५ +बँका) व्दारे भरणा करता येईल. अथवा अर्जदार ऑनलाईन अर्ज सादर करुन भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे, संग्राम केंद्र/सीएससी (नागरिक सेवा केंद्र) येथे चलनाव्दारे शुल्काचा भरणा करण्याचा पर्याय स्वीकारु शकेल.

६ http://maharecruitment.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतीमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

## ७.११ शुल्क भरणा :

उमेदवाराने वनरक्षक पदासाठी आवश्यक असलेले शुल्क खालीलप्रमाणे भरावे.
**(सेवाशुल्क नापरतावा राहील)**

| **प्रवर्ग** | **शुल्क रु.** |
|---|---|
| खुला | रू. ३००/- |
| मागासवर्गीयाकरिता | रू. १५०/- |

**महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक आरटीए-१०७९/०/४८२/१६-अ, दिनांक ३ जुलै, १९८० मधील परिच्छेद क्रमांक २ मध्ये माजी सैनिकांना परिक्षा फी तसेच अर्जाचे फी मधुन सुट दिलेली आहे.**

यशस्वीरित्या अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता खाली नमूद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा.

१ शुल्क भरण्याकरीता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील "माझे खाते" या लिंक वर क्लिक करावे.

२ "माझे खाते"या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या कार्यालयाचे नाव निवडल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदाची यादी शुल्क भरल्याच्या/न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर "Unpaid" असे लिहीलेले असेल, त्या ठिकाणी "Pay Now"अशी लिंक उपलब्ध असेल.

३ Pay Now या लिंक वर क्लिक केल्यानंतर तीन पर्याय उपलब्ध होती (अ) ऑनलाईन पेंमेट (ब) नागरी सुविधा केंद्र. (क) चलनाव्दारे.

४ क्रेडीट,डेबीट कार्ड अथवा नेट बँकींगच्या सहाय्याने ऑनलाईन पेंमेट करता येईल.

५ नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. सदर कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

६ ज्या उमेदवारांना इंटरनेटव्दारे स्वत: अर्ज भरावयाचा नसेल, असे उमेदवार महा-ई-सेवा केंद्रामार्फत आपला अर्ज करु शकतात. त्याचवेळी उमेदवाराकडून परिक्षा शुल्क व सेवा केंद्राचे शुल्क स्वीकारले जाईल. उमेदवारांना पैसे भरल्याची पावती महा-ई-सेवा केंद्रातर्फे देण्यात येईल. या सुविधेमध्ये आवेदन अर्ज भरणे व पैसे

भरल्यानंतर पैसे भरल्याची पावती देणे याचा समावेश असेल. फोटो/स्वाक्षरी स्कॅन किंवा अर्जाच्या प्रिंट करीता स्वतंत्र रक्कम केंद्रचालकाकडून आकारली जाईल.

७ चलनाव्दारे हा पर्याय निवडल्यास उपलबध होणा-या चलनाची प्रत घेवून भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

८ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे भरावयाचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या २ तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परिक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील.

९ चलनाव्दारे शुल्क स्विकारण्याकरीत भारतीय स्टेट बँक उमेदवाराकडून परिक्षा शुल्क व्यतिरिक्त नियमानुसार सेवाशुल्क आकारेल. अशा प्रकारे उमेदवारास चलनाव्दारे शुल्क भरताना परिक्षा शुल्क + बॅकेचे सेवा शुल्क भरावे लागतील.

१० सदर पदासाठी आवश्यक ते शुल्क विहित मुदतीत न भरल्यास अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

## ७.१२ सर्व साधारण सुचना:

१ नोंदणी व अर्ज भरण्याची प्रक्रिया उमेदवाराने स्वत:च करणे आवश्यक आहे.

२ अर्ज मराठी व इंग्रजी मध्ये उपलब्ध करुन देण्यात आला असला तरी संगणक प्रक्रियेकरीता अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. अर्जातील संपूर्ण माहिती कॅपीटल लेटर्स (CAPITAL LETTERS) मध्ये भरावी. संक्षिप्तपणे (Abbreviations) वा आदयाक्षरे (Initials) न देता संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता नमूद करावा. नावाच्या/पत्ताच्या दोन भागामध्ये एक स्पेस ने जागा सोडावी.

३ महिला उमेदवारानी पुर्वाश्रमीच्या नावाने (By Birth) अर्ज करणे आवश्यक आहे.

४ SSC अथवा तत्सम प्रमाणपत्रावरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत. त्यानंतर नाव बदलले असल्यास अथवा प्रमाणपत्रातील नावात कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास त्यासंबंधीच्या बदलासंदर्भातील राजपत्राची प्रत कागदपत्र पडताळणीच्यावेळी सादर करावीत.

५ पत्रव्यवहाराचा स्वत:चा पत्ता इंग्रजीमध्ये लिहावा. व्यवसायीक मार्गदर्शन केंद्र, स्वयं अध्ययन मार्गदर्शन केंद्र/वर्ग अथवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शक केंद्राचा/संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देवू नये.

६ अर्जामध्ये केलेला दावा व कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेल्या सारांश पत्रातील अथवा सादर केलेल्या कागदपत्रांतील दावा यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती अधिकृत समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्याने/मिळाल्याने उमेदवारी रद्द होवू शकते.

७ संबंधीत पदाच्या/परिक्षेच्या जाहिरात/ अधिसुचनेमध्ये दिलेल्या सर्व सुचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता आजमावली जाईल व त्याच्या आधारेच निवड प्रक्रिया पूर्ण होईल.

८ एकाहून अधिक सेवेच्या/पदाच्या अथवा इतर परिक्षा अथवा मुलाखती एकाच दिवशी असल्यास त्याबाबत उमेदवाराने विचारपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे. परिक्षेचा दिनांक, वेळ, केंद्र यामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करण्यात येणार नाही. तसेच भरलेल्या शुल्काचा परतावा देखील करता येणार नाही.

९ उमेदवाराच्या माहिती व मदतीकरीता मे. महाऑनलाईन लिमिटेड यांच्या कॉल सेंटरवरील दूरध्वनी क्रमांक ०२२-६१३१६४०३ वर उमेदवारांना योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध होईल.

१० ठाणे व पालघर जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्रातील पदासाठी इच्छूक स्थानिक अनुसूचित जमातीचे उमेदवारांनी त्या त्या जिल्ह्यासाठी स्वतंत्र अर्ज दाखल करावा. सदर पदासाठी इतर जिल्ह्यातील अनुसूचित जमातीचे उमेदवारांनी अर्ज सादर केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचा विचार केला जाणार नाही.

**७.१३ वरील कार्यपध्दती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे. याशिवाय दुस-या पध्दतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविण्यात येतील.**

**७.१४** उमेदवाराने अर्जात स्वत:चे नाव सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करु इच्छीत आहे तो प्रवर्ग, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक व इमेल आयडी इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिती चुकल्यास त्यास वनविभाग जबाबदार राहणार नाही.

**७.१५** उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेशपत्रावर/उपस्थितीपत्रावर एकाच प्रकरची असेल याची दक्षता घ्यावी. तसेच उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरीलप्रमाणे सर्वठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी.

**७.१६** पूर्णत: माहिती भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट काढून घ्यावी. प्रिंट काढलेल्या अर्जाची प्रत जपून ठेवावी. अर्जाची प्रिंट कागदपत्रे तपासणीच्या वेळी सोबत आणणे आवश्यक आहे.

**७.१७** अर्ज सादर केलेल्या उमेदवारास कागदपत्रांच्या छाननीशिवाय शारीरिक क्षमता चाळणी चाचणी परिक्षेस परवानगी देण्यात येत आहे. त्यामुळे उमेदवार शारिरिक क्षमता चाळणी चाचणी परिक्षेत उत्तीर्ण झाला तरी आवश्यक ती शैक्षणिक व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ शारिरीक क्षमता चाळणी परिक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारास निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवाराने संबंधीत पदाच्या पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा.

**७.१८** भरती प्रक्रियेच्या संदर्भातील सर्व माहिती व त्याअनुषंगाने होणा-या बदलाबाबतची सर्व माहिती केवळhttp://mahaforest.gov.in व http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. याव्यतिरिक्त कोणत्याही माध्यमाव्दारे भरतीप्रक्रियेची माहिती उपलब्ध होणार नाही याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

**७.१९** विहित दिनांकानंतर व विहित वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणालीमध्ये स्वीकृत केला जाणार नाही.

**७.२०** उमेदवाराने आपला वैध इमेल आयडी व भ्रमणध्वनी नोंदविणे आवश्यक आहे. तसेच सदर इमेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक भरती प्रक्रियेचा अंतिम निकाल लागेपर्यंत वैध असणे आवश्यक आहे. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेला इमेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चुकीचा/अपूर्ण असल्यास तसेच भ्रमणध्वनी क्रमांक NCPR Registered (DND) असल्यामुळे संपूर्ण भरतीप्रक्रिये दरम्यान त्याव्दारे पाठविल्या जाणा-या सुचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसेच इमेल आयडी व भ्रमणध्वनी संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना वनविभाग जबाबदार राहणार नाही. प्रवेशपत्र Download करण्याबाबतचा संदेश इमेल/एसएमएस व्दारे कळविण्यात येईल. उमेदवाराने आपल्या इमेल आयडीची कोणत्याही परिस्थितीत इतर व्यक्तींसोबत देवाण-घेवाण करु नये. एखादया उमेदवाराचा वैध इमेल आयडी नसल्यास त्याने अर्ज करण्यापूर्वी स्वत:चा इमेल आयडी तयार करणे आवश्यक आहे.

## ८. महत्वाच्या सुचना

**८.१. पोष्टाने अथवा इतर कोणत्याही प्रकारे आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. ऑनलाईन अर्जाची प्रत या कार्यालयास समक्ष अथवा पोष्टाने अथवा या कार्यालयाचे वेबसाईड वर पाठवू नये. तसेच याबाबत या कार्यालयाशी कुठलाही संपर्क साधू नये.**

**८.२. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी स्वतचा मोबाईल नंबर व ई-मेल आय-डी नोंद करतेवेळी काळजीपूर्वक भरावा.**

**८.३. शारिरीक तपासणी चाचणी तारीख, धावण्याची क्षमता चाचणी तारीख मे. महाऑनलाईन लिमिटेड या संस्थेच्या** http://maharecruitment.mahaonline.gov.in **व** http://mahaforest.gov.in **या संकेत स्थळावर प्रसिध्द केली जाईल. धावण्याच्या क्षमता चाचणीबाबत उमेदवारास पत्राद्वारे कळविण्यात येणार नसून धावण्याच्या चाचणीबाबतचे प्रवेशपत्र व धावण्याच्या चाचणीबाबत स्थळाचा पत्ता हे ऑनलाईन** http://maharecruitment.mahaonline.gov.in **संकेत स्थळावर चाचणीपूर्वी आठ दिवस आधी अर्ज क्रमांकानुसार उपलब्ध करुन देण्यांत येईल. प्रवेश पत्राची प्रिंट स्वत: उमेदवाराने प्राप्त करुन घ्यावी. उमेदवाराने त्यांचा अर्ज क्रमांक संकेत स्थळावर नमूद करुन लॉगऑन केल्यानंतर प्रवेश पत्राची सॉफ्ट कॉपी संकेतस्थळावर उपलब्ध होईल.**

८.४. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यांत येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक प्रमाणपत्रे व अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही त्रुटी राहिल्यास अर्ज संगणकाद्वारे स्विकारला जाणार नाही त्यामुळे उमेदवाराने अर्ज परिपूर्ण् भरण्याची दक्षता घ्यावी. अंतिम निवडपूर्व कागदपत्र तपासण्याचे वेळी सदर कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहिल.

८.५. ऑनलाईनद्वारे अर्ज सादर करुन अथवा खोटी कागदपत्रे सादर करुन जे उमेदवार नोकरी मिळवतील अथवा कागदपत्राच्या छाननीच्या वेळी काही बाबी निवड समितीच्या निदर्शनास न आलेस व भविष्यात कोणत्याही टप्प्यावर उमेदवार नेमणूकीसाठी अपात्र असल्याचे निदर्शनास आल्यास त्यास सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय/परिपत्रके इ. नुसार सेवेतून तात्काळ कमी करण्यात येईल व त्यास सेवेविषयक कोणतेही फायदे अनुज्ञेय राहणार नाहीत.

८.६. निवड समितीने तयार केलेली निवड सूची एक वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करतांना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारांत घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय ठरेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

८.७. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतर तसेच शारिरीक पात्रता पूर्ततेच्या अधिन उमेदवाराची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक/समांतर आरक्षण निहाय अंतिम निवड केली जाईल.

८.८. उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी तो वनरक्षक पदाची अर्हता पूर्ण करतो कि नाही याची खात्री करावी. भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज अपात्र ठरला तर उमेदवाराने भरलेली भरती प्रक्रिया शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही. तसेच इतर कोणत्याही कारणास्तव भरती प्रक्रिया शुल्क परत केले जाणार नाही. उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तो त्या व्यक्तिची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल.

८.९. विविध परिक्षेनंतर (शारीरिक क्षमता चाचणी) पात्र ठरलेल्या उमेदवाराने शैक्षणिक अर्हता,वय, अनुभव, जातीचा दाखला तसेच इतर आवश्यक ती मूळ प्रमाणपत्रे व त्यांच्या साक्षांकित प्रती या केंद्र / राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्टमास्टर, मुख्याध्यापक व याबाबत प्राधिकृत सक्षम अधिका-यांकडून साक्षांकित करुन अंतिम निवडपूर्व कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे उमेदवारांस बंधनकारक आहे.

८.१०. विहीत वयोमर्यादेतील शासकीय सेवेत असलेल्या कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांच्या परवानगीने भरावेत व विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र कागदपत्रांच्या कार्यालयीन तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

८.११ जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र या कार्यालयात नाव नोंदणी केली असली तरी वरील पदासाठी विहित नमुन्यात स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक राहिल.

८.१२. अर्ज एकदा ऑनलाईन सादर केल्यानंतर त्यात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही. याची उमेदवाराने नोंद घ्यावी. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवाराने आवश्यक सर्व तपशिल स्वत: जवळ तयार ठेवावा व अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी.

## ९. भरती बाबत अर्जदारासाठी इतर आवश्यक सूचना :-

९.१ निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सूचना दिली जाणार नाही.

९.२ निवड होऊन नियुक्ती मिळालेल्या उमेदवारांना नियमानुसार प्रशिक्षण, विभागीय परीक्षा, विहित केलेल्या भाषेची परीक्षा तसेच संगणक परीक्षा उतीर्ण होणे आवश्यक राहील.

९.३ वनरक्षक पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांनी विहीत कालावधीचा वनरक्षक अभिक्रम प्रशिक्षण पाठयक्रम यशस्वीरित्या पुर्ण करणे बंधनकारक राहील.

९.४ आरक्षित पदांकरिता उमेदवारांनी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे वैध प्रमाणपत्र शासनाचे प्रचलित नियमानुसार विहित वेळात सादर करणे आवश्यक राहील.

९.५ उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीच्या संबंधात कोणत्याही प्रकारचा वशीला किंवा दबाव आणण्याचा किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविली जाईल.

९.६ निवड झालेल्या उमेदवारांची वनवृत्ता अंतर्गत ग्रामीण व दुर्गम क्षेत्रात कोठेही नियुक्ती होऊ शकते.

९.७ पदभरती प्रक्रियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारीरिकदृष्टया इजा पोहचल्यास अथवा नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

९.८ वनरक्षक पदावर नियुक्ती केलेल्या उमेदवारांची कधीच आंतरवृत्तीय बदली होणार नाही याची नोंद संबंधित उमेदवारांनी घ्यावी.

९.९ अ.जा. / अ.ज. प्रवर्ग वगळता इतर सर्व मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सन २०१५-१६ चे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. मात्र कोणत्याही परिस्थितीत तपासणीच्या वेळी सदर प्रमाणपत्र नसल्यास उमेदवाराचा नियुक्तीस विचार करण्यात येणार नाही.

९.१० निवड प्रक्रियेच्या विविध टप्प्यावरील ठरवून दिलेल्या कार्यक्रमाची स्थळ व वेळ याचे पालन करणे उमेदवारांना बंधनकारक राहील. ठरवून दिलेल्या कार्यक्रमानुसार उमेदवार दिलेल्या दिनांकास व वेळेत उपस्थित न राहिल्यास ते भरती प्रक्रियेच्या पुढील सर्व टप्प्यांसाठी अपात्र ठरविले जातील.

अध्यक्ष,
प्रादेशिक निवड समिती
तथा
मुख्य वनसंरक्षक (प्रा.),
ठाणे वनवृत्त, ठाणे

ठिकाण :- ठाणे
दिनांक :- २६/०९/२०१६